N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सिंधुदुर्ग **P.S.(ठाणे):** आचरा **Year (वर्ष):** 2022

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0005 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 21/03/2022 22:16 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शनिवार **Date From (दिनांक पासून):** 05/03/2022

**Time Period (कालावधी):** पहर 7 **Date To ( दिनांक पर्यंत):** 05/03/2022

**Time From (वेळेपासून):** 18:47 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 21:06 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 21/03/2022 **Time (वेळ):** 20:40 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 016 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 21/03/2022 20:54 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 4 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** आचरा रामेश्वर काम्पप्लेक्स,मालवण, 416614

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** दिपक ज्ञानदेव कांबळे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1971 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

**(h) Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | अन्टी करप्शन ब्युरो सिंधुदुर्ग,सिंधुदुर्ग,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | अन्टी करप्शन ब्युरो सिंधुदुर्ग,सिंधुदुर्ग,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9890079208

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | विठ्ठल वैजीनाथ कंठाळे | | | 1. आचरा वरचीवाडी ,सिराक हटेल मागे बिल्डींगमध्ये ,मालवण,आचरा,सिंधुदुर्ग, महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी दिपक ज्ञानदेव कांबळे वय-51 वर्षे, पोलीस उपअधिक्षक न्टी करप्शन ब्युरो, सिंधुदुर्ग सरकार तर्फे फिर्याद देतो की,मी दिनांक 20/06/2019 रोजी पासुन न्टी करप्शन ब्युरो, सिंधुदुर्ग (कुडाळ) या कार्यालयात पोलीस उपअधिक्षक म्हणून कार्यरत आहे. दिनांक 04/03/2022 रोजी आम्ही आमचे राहते घरी हजर असताना, न्टी करप्शन ब्युरो, सिंधुदुर्ग येथील नेमणुकी पोलीस हवालदार बक्कल नं. 88 जनार्दन रेवंडकर यांनी तक्रारदार श्री गोलतकर यांची लोकसेवक यांचे विरुध्द लाचेच्या मागणी संदर्भात तक्रार असल्याचे सांगून, दिनांक 05/03/2022 रोजी सकाळी 11.00 वा. पर्यंत त्यांना त्यांचे घरी तोंडवळी ता.मालवण येथे आम्ही भेटण्यास येतो असे सांगितले असल्याचे हकिगत आम्हांस कळविली.दिनांक 05/03/2022 रोजी तक्रारदार श्री. गोलतकर यांची प्रत्यक्ष भेट घेवून, त्यांचे तक्रारीचे अनुषंगाने पुढील कार्यवाही मध्ये पंच साक्षीदार म्हणून काम करणेकरीता वर्ग 3 चे दोन कर्मचारी मिळणेसाठी वनक्षेत्रपाल कणकवली व गटविकास अधिकारी, मालवण यांना लेखी पत्र तयार करून, त्यांचेशी फोनव्दारे संपर्क साधून त्यांच्या आस्थापनेवरील वर्ग- 3 चे प्रत्येकी एक प्रमाणे अनुक्रमे 1) श्री. अविनाश रामराव राठोड, वनरक्षक, भिरवंडे ता.कणकवली, 2) श्री. तुषार विक्रम वळवी, कनिष्ठ सहाय्यक, पं.स. मालवण असे शासकिय कर्मचारी उपलब्ध करून घेतले. त्यानंतर दिनांक 05/03/2022 रोजी तक्रारदार श्री. राहुल शाम गोलतकर वय-25 वर्षे, रा. तोंडवळी ता. मालवण, जिल्हा सिंधुदुर्ग यांची तोंडवळी तळाशिल जेठी येथील शंकरच्या मंदीरात प्रत्यक्ष भेट घेतली. तक्रारदार श्री. गोलतकर यांनी लोकसेवक श्री. विठ्ठल कंठाळे, तलाठी सजा तोंडवळी ता.मालवण, जिल्हा सिंधुदुर्ग हे वाळु वाहतुकीच्या गाडयावर कारवाई न करण्याकरीता आपलेकडे 50,000/- रुपयांची मागणी करीत असल्याची तक्रार असल्याचे पंचासमक्ष सांगून स्वहस्ताक्षरात तक्रार लिहुन दिली. त्यातील मजकुर खालील प्रमाणे-मी तोंडवळी मालवण गावचा रहिवाशी असून त्या ठिकाणी मी माझे कुंटुंबासमवेत राहतो. मी तसेच माझे गावचे मित्र स्वप्नील पेडणेकर, सुजय पुजारे, ओमकार पाटील असे मिळून तोंडवळी गावातील खाडी किनारी वाळु उपसा करून वाळु विक्रीचा व्यवसाय करतो. आमचे गावचे तलाठी श्री. विठ्ठल कंठाळे हे वाळु उपसा ठिकाणी रम्पवर येवून तसेच वाळुच्या गाडया थांबवून दंड न करण्यासाठी पैशाची मागणी करून नाहक त्रास देतात. मा.जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांचे कार्यालयाकडून वाळू उपसा टेंडर मंजुर झालेले आहे. परंतु अदयाप त्याचा पास मिळालेला नाही. त्यामुळे आम्ही 15 ते 20 दिवस होतील तेव्हापासून वाळु उपसाचे काम बंद ठेवलेले आहे. असे असून सुध्दा तलाठी श्री. कंठाळे यांना मला तुझ्या मित्रांकडून 50,000/- रुपये गोळा करून आज दिनांक 05/03/2022 रोजी घेवून ये असे फोनव्दारे कळविले आहे. तलाठी श्री कंठाळे यांनी मला वाळु व्यवसायातील तुझ्या मित्रांकडून पैसे गोळा करून 50,000/- रुपये घेवून आज दिनांक 05/03/2022 रोजी तोंडवळी तिठा येथे बोलविले आहे. परंतु तलाठी श्री. कंठाळे यांना पैसे देण्याची माझी अथवा माझ्या मित्रांची इच्छा नाही. त्यावेळी माझ्या मित्रांनी मला तलाठी श्री. कंठाळे यांचे विरुध्द तक्रार देण्यास सांगितलेली आहे. तलाठी श्री.कंठाळे याचेशी माझी कोणत्याही प्रकारची वाकडीक अथवा पैशाचा देवघेवीचा व्यवहार प्रलंबित नाही. त्यामुळे श्री कंठाळे यांचे विरुध्द आपल्या विभागाकडून कारवाई व्हावी हि विनंती. अशी तक्रार आहे.तक्रारदार

श्री गोलतकर यांचे वरील प्रमाणे तक्रारीचे अनुषंगाने लोकसेवक तलाठी श्री विठ्ठल कंठाळे सजा तोंडवळी ता.मालवण, जिल्हा सिंधुदुर्ग हे लाचेची मागणी करतात अगर कसे? याची खात्री करण्याकरीता तक्रारदारासोबत पंचांस पाठवून पडताळणी करण्याचे ठरविले. त्यावेळी तक्रारदार श्री गोलतकर यांनी भेटण्यास येण्यापुर्वी फोन करून ये असे श्री कंठाळे यांनी आपणास सांगितले असल्याचे आम्हांस सांगितले. त्यावरून आमच्या सुचनेवरुन तक्रारदार श्री गोलतकर यांनी स्वत:चा मोबाईल क्रमांक 9405420261 वरून लोकसेवक श्री. कंठाळे तलाठी यांना मोबाईल क्रमांक 8788745088 वर दिनांक 05/03/2022 रोजी 14.15 वाजता कल केला असता त्यांनी तो कल रिसीव्ह केला नाही. त्यानंतर 14.25 वाजता तलाठी श्री. कंठाळे यांनी तक्रारदार श्री गोलतकर यांच्या मोबाईल वर कल बक केला, त्यावेळी तक्रारदार श्री गोलतकर यांनी लोकसेवक श्री कंठाळे यांना तुम्ही काल सांगितलेले त्या संदर्भात बोललो होतो सगळ्याशी म्हणून कल केला होता. तुमच्याकडे वेळ आहे काय तुम्हाला भेटायला येवू असे विचारले असता, लोकसेवक श्री कंठाळे यांनी चालतय ना आता.. मग संध्याकाळी या ना जिमला असे संभाषण केले. सदरचे संभाषण डिजिटल व्हाईस रेकर्डरव्दारे त्यामधील मेमरी कार्डवर परस्पररित्या ध्वनीमुद्रीत झालेले आहे. तक्रारदार श्री. गोलतकर यांना तुम्ही जिमला किती वाजता जाता? असे विचारले असता, तक्रारदार यांनी सायंकाळी 18.00 ते 18.30 वा. च्या मानाने जातो असे सांगितले. त्यावेळी तक्रारदार श्री गोलतकर यांचे सोबत पंच श्री. वळवी यांना आचरा येथील जिमच्या ठिकाणी पाठवून लोकसेवक तलाठी श्री कंठाळे यांची लाचेच्या मागणी संदर्भात पडताळणी करण्याचे ठरविले.त्यानंतर सर्व कायदेशीर बाबीची पुर्तता करून दिनांक 05/03/2022 रोजी सायंकाळी 18.47 ते 21.06 वा. चे मुदतीत लोकसेवक श्री कंठाळे यांची लाचेची मागणी संदर्भात पडताळणी केली असता लोकसेवक तलाठी श्री कंठाळे यांनी तक्रारदार श्री राहुल गोलतकर यांचेशी वीस एक हजार तरी मिळाले पाहीजे होते आपल्याला, कस होत समजा असे पैसे काढायला लागतात. मग मला पण ते उगाच पकडून बरोबर वाटत नाही. एखादयाच पण काय करायच, ते टेंशन येत. मग प्रत्येक दिवशी दहा पंधरा हजार देतील गाडी पकडल्यावर असे म्हणून, बघ तु तुझ्या प्रयत्नाने किती पुरेसे होतील तेवढे पंचवीस पर्यंत बघ आपल काय नसत जास्त, आता असा दंड वसुल होण्यापेक्षा असे भरलेले परवडले ना त्यांना मी तेच सांगत होतो. बंटीला असे सांगून उदया संध्याकाळी आठ वाजेपर्यंत ये असे संभाषण करून पंचवीस हजार रुपयांची लाचेची मागणी केली असल्याचे डिजीटल व्हाईस रेकर्डरमधील मेमरी कार्डवर ध्वनीमुद्रीत झालेले असल्याचे आढळून आले. सदर बाबत दिनांक 05/03/2022 रोजी सकाळी 10.30 ते दिनांक 06/03/2022 रोजी 00.30 वा. चे मुदतीत सविस्तरपणे पडताळणी पंचनामा करण्यात आलेला असून, तक्रारदार श्री. गोलतकर व लोकसेवक श्री कंठाळे यांचेमध्ये फोनवर तसेच प्रत्यक्ष भेटी दरम्यान झालेल्या संभाषणाची स्क्रिप्ट तयार करून पडताळणी पंचनाम्यामध्ये समाविष्ठ करण्यात आलेली आहे.सदर पडताळणीच्या अनुषंगाने दिनांक 06/03/2022 रोजी सायंकाळी लोकसेवक श्री. विठ्ठल कंठाळे, तलाठी सजा-तोंडवळी ता.मालवण यांचे विरुध्द सापळा अजामविण्याचे निश्चित करण्यात आले होते. परंतु दिनांक 06/03/2022 रोजी तक्रारदार श्री गोलतकर घरी हजर असताना, लोकसेवक तलाठी श्री कंठाळे यांनी मोबाईल क्रमांक 8788745088 वरुन तक्रारदार यांना मोबाईल क्रमांक 9405420261 वर 11.28 वा. कल करून दोन मिनीट तुझ्याशी बोलायच आहे असे सांगून तक्रारदार श्री. गोलतकर यांना तोंडवळी तीठा या ठिकाणी बोलाविले. त्यावरून तक्रारदार श्री गोलतकर यांनी लोकसेवक श्री कंठाळे यांची प्रत्यक्ष भेट घेतली. तेव्हा लोकसेवक श्री विठ्ठल कंठाळे यांनी तक्रारदार श्री गोलतकर यांना, न्टी करप्शन विभागाकडे माझी तक्रार झाली असल्याची मला माहीती मिळालेली असल्याचे सांगुन, तेंव्हा तु काय आज पैसे आणु नकोस, दोन चार दिवस थांब तुला सांगतो असे सांगितले. त्यानंतर त्याच दिवशी तक्रारदार श्री गोलतकर त्यांचा मित्र श्री.स्वप्नील पेडणेकर ऊर्फ बंटी हा कुडाळ येथुन परत तोंडवळी गावी येत असताना, ओझर याठिकाणी वाटेत लोकसेवक  तलाठी श्री.कंटाळे हे त्यांना भेटले  व त्यांनी राहुलने माझी न्टी करप्शन विभागाकडे तक्रार केली असल्याचे समजते अशी हकिगत सांगितली असल्याने तक्रारदार श्री.गोलतकर यांनी आम्हांस सांगितली. त्यामुळे दिनांक 06/03/2022 रोजी लोकसेवक कंटाळे यांचे विरुध्द सापळा अजमाविण्यात आलेला नाही. लोकसेवक कंठाळे यांचे सांगणेप्रमाणे दोन चार दिवस वाट पाहुन पुढील कारवाई करण्याचे निश्चित केले. परंतु लोकसेवक तलाठी श्री.विठ्ठल कंठाळे यांनी दिनांक 11/03/2022 रोजी पर्यत तक्रारदार श्री.गोलतकर यांनी फोनव्दारे, प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे संपर्क साधलेला नाही. यावरुन लोकसेवक तलाठी श्री.कंठाळे यांना संशय आलेला असल्याने, ते तक्रारदार श्री.गोलतकर यांचेकडुन लाच रक्कम स्विकारतील असे वाटत नसल्याची तक्रारदार श्री.गोलतकर यांची खात्री झाल्याने, तक्रारदार श्री. गोलतकर यांना तसा सविस्तरपणे पंचासमक्ष जबाब दिला. तो कागदपत्रामध्ये सामील करण्यात आलेला आहे. दिनांक 05/03/2022 रोजी लोकसेवक श्री.विठ्ठल कंठाळे, सजा तोंडवळी ता.मालवण यांची लाचेच्या मागणी संदर्भात केलेल्या पडताळणी कारवाई मध्ये तक्रारदार श्री.गोलतकर व लोकसेवक श्री.कंठाळे यांचेमध्ये फोन व्दारे तसेच प्रत्यक्ष भेटी दरम्यान लाचेच्या मागणी संदर्भात झालेले संभाषण डिजीटल व्हाईस रेकर्डरव्दारे परपस्परपणे त्यामधील मेमरी कार्डवर ध्वनीमुद्रीत झालेले असल्याने, ते मेमरीकार्ड दिनांक .11/03/2022 रोजी लखोटा फोडल्याचा पंचनामा कारवाई मध्ये दोन पंचासमक्ष पुराव्याकामी सिलबंद लखोटयामध्ये जप्त करुन ताब्यात घेण्यात आलेले आहे.अशा रितीने लोकसेवक श्री.विठ्ठल कंठाळे, तलाठी सजा तोंडवळी, ता.मालवण यांनी त्यांना लोकसेवक या नात्याने मिळालेल्या अधिकाराचा व पदाचा दुरुपयोग करून तक्रारदार श्री. राहुल गोलतकर यांचे व त्यांच्या मित्रांच्या वाळु वाहतुकीच्या गाडयांवर कारवाई न करणेकरीता त्यांचेकडे दिनांक 05/03/2022 रोजी लाचेची मागणी केली म्हणून माझी त्यांच्या विरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक कायदा सन 1988 (संशाधन सन 2018) चे कलम 7 प्रमाणे सरकारतर्फे कायदेशीर फिर्याद आहे.

**13.Action Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**

**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** kuldeep sambhaji patil(SI (Sub-Inspector)) / psi **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):**

**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): kuldeep sambhaji patil
**Rank**(पद): SI (Sub-Inspector)
**No.**(सं.): psi